# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश २०१९-२०/२०१९/१५५६ दिनांक : ०४.०४.२०१९.

04 APR 2019

**परिपत्रक:**

प्राचार्य,
पुणे विभागातील पोस्ट एस.एस.सी. व पोस्ट एच.एस.सी.
**पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रथम व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी., पोस्ट एच.एस.सी. पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्र (Facilitation Centre) ठरविण्याबाबत..**

**संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/(प्र.क्र. ०६/०९)/तांशि-५ दिनांक ०६.०२.२०१९.**

**२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १०/पदविका/प्रवेश निश्चिती केंद्र/२०१९/३२३ दिनांक २२.०३.२०१९.**

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, संदर्भाधीन शासन निर्णयान्व्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदविका स्तरावरील अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने आवश्यक ती गोपनीयाता राखुन, उचित रितीने, विद्यार्थी व पालक यांचे हित विचारात घेता प्रचार, प्रसार व जागरुकता निर्माण करुन प्रक्रिया राबविण्याच्या संबंधात सर्व निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची विविध पदविका अभ्यासक्रमांची केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने या या संचालनालयामार्फत राबविण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ करीता प्राप्त ई.बी.सी./वसतीगृह रकमांचे उपयोगिता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत या विभागीय कार्यालयास सादर केलेले नसेल अशा संस्थांनी **दिनांक १०.०४.२०१९ पूर्वी** प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात हस्तदेय सादर करावीत अन्यथा सदर संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता सुविधा केंद्र देणेबाबत शिफारस संचालनालयास करण्यात येणार नाही याची संबंधीत संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे